भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# वायुयान अधिनियम, १९३४

**(सन १९३४ चा अधिनियम क्रमांक २२)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Aircraft Act, 1934

**(Act No. 22 of 1934)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये २७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि एअरक्राफ्ट ॲक्ट, १९३४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठे १४० ते १४८ वर प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Aircraft Act, 1934 as on the 6th August, 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November, 2006 on pages 140 to 148.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# वायुयान अधिनियम, १९३४

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. विवक्षित वायुयानांना सूट देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

४. १९४४ च्या अभिसंधीची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

५. नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

५क. निदेश देण्याचा अधिकार

६. संकटकाळात आदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

७. अपघाताच्या अन्वेषणाबाबत नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

८. वायुयान रोखून ठेवण्याचा अधिकार

८क. सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार

८ख. सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी संकटकालीन अधिकार

८ग. दावा न करण्यात आलेल्या मालमत्तेची सुरक्षित अभिरक्षा व ती पुन्हा स्वाधीन करणे याबाबत नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

९. जहाजभंग व नष्टशेष

९क. इमारतींचे बांधकाम, वृक्षारोपण, इत्यादींना प्रतिषेध किंवा त्यांचे विनियमन करणे याबाबतचा केंद्र सरकारचा अधिकार.

९ख. नुकसानभरपाई देणे

९ग. नुकसानभरपाईविषयीच्या निवाड्यांबाबत अपिले

९घ. लवादास दिवाणी न्यायालयांचे विवक्षित अधिकार असणे.

१०. या अधिनियमाखालो केलेल्या नियमांचे उल्लंघन करून केलेल्या कृत्याकरिता शास्ती

११. धोकादायक उड्डाणाकरिता शास्ती

११क. कलम ५क अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती

११ख. कलम ९क अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती

१२. अपराधास अपप्रेरणा देणे आणि अपराध करण्याचा प्रयत्न करणे यासाठी शास्ती

१३. सरकारजमा करण्याबाबत आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार

१४. प्रकाशनानंतर नियम करणे

१४क. नियम संसदेसमोर मांडणे

१५. भारतात नोंदणीकृत नसलेल्या वायुयानावरील पेटंट मिळालेल्या नवशोधाचा वापर

१६. सीमाशुल्क कार्यपद्धती लागू करण्याचा अधिकार

१७. विवक्षित दाव्यांना मनाई

१८. अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या कृतीची व्यावृत्ती

१९. हा अधिनियम लागू होण्याची व्यावृत्ती

२०. निरसित

**इंग्रजी - मराठी शब्दसूची**

**मराठी - इंग्रजी शब्दसूची**

# वायुयान अधिनियम, १९३४

## (१९३४ चा अधिनियम क्रमांक २२)

(६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान)

[१९ ऑगस्ट, १९३४]

**वायुयानाची निर्मिती, ताबा, वापर, प्रचालन, विक्री, आयात आणि निर्यात यांच्या नियंत्रणासाठी अधिक चांगल्या तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** वायुयानाची निर्मिती, ताबा, वापर, प्रचालन, विक्री, आयात आणि निर्यात यांच्या नियंत्रणासाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.**

**१.** (१) या अधिनियमास, "वायुयान अधिनियम, १९३४" असे म्हणावे.

(२) हा अधिनियम संपूर्ण भारतास लागू असेल, आणि,----

(क) भारतीय नागरिक जेथे जेथे असतील तेथे त्यांना ; आणि

(ख) भारतात नोंदणी झालेल्या वायुयानास व त्यावरील व्यक्ती त्या जेथे जेथे असतील तेथे त्यांना ;

— देखील लागू असेल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात विषय व संदर्भ यांच्या विरुद्ध काहीही नसेल तर,—

(१) "वायुयान" याचा अर्थ, हवेच्या प्रतिक्रियेपासून [१][पृथ्वीच्या पृष्ठभागाशी होणाऱ्या हवेच्या प्रतिक्रियेखेरीज] वातावरणामध्ये आधार घेऊ शकणारे कोणतेही यंत्र, असा आहे आणि त्यामध्ये स्थिर किंवा अस्थिर असे बलून, हवाई जहाज, पतंग, ग्लायडर्स् आणि उड्डाण यंत्रे यांचा समावेश होतो ;

(२) "विमानतळ" याचा अर्थ, वायुयान उतरवण्यासाठी किंवा प्रस्थान करण्यासाठी एकतर संपूर्णतः किंवा अंशतः वापरावयाचा उद्देश असलेले कोणतेही निश्चित किंवा मर्यादित मैदान किंवा जल क्षेत्र, असा आहे आणि त्यात, त्यावरील किंवा त्याच्याशी संबंधित सर्व इमारती, छपऱ्या, याने, धक्के आणि इतर बांधकामे यांचा समावेश होतो ;

[१][(२क) कोणत्याही विमानतळाच्या संबंधात "विमानतळ निर्देश ठिकाण" याचा अर्थ, वायुयानाचे प्रस्थान किंवा ते उतरवण्यासाठी राखून ठेवलेल्या विमानतळाच्या त्या भागाचा भूमितीय मध्य किंवा त्या जवळील भाग येथे क्षितिजसमांतर जागेत स्थापित केलेले ठराविक ठिकाण, असा आहे ;]

(३) "आयात" याचा अर्थ, भारतात आणणे, असा आहे ; आणि

(४) "निर्यात" याचा अर्थ, भारताच्या बाहेर नेणे, असा आहे.

**विवक्षित वायुयानांना सूट देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**३.** केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणतेही वायुयान किंवा वायुयानांचा वर्ग आणि कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग यांना या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींमधून सूट देता येईल किंवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरबदलांच्या अधीन राहून अशा तरतुदी, असे वायुयान किंवा अशा व्यक्ती यांना लागू करण्याबाबत निदेश देता येतील.

**१९४४ च्या अभिसंधीची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

[२][**४.** केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ७ डिसेंबर, १९४४ रोजी शिकागो येथे स्वाक्षरी केलेल्या व वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय नागरी विमानचालनाबाबतच्या अभिसंधीचे (आंतरराष्ट्रीय दर्जा आणि सुचविण्यात आलेल्या प्रथा यांच्याशी संबंधित कोणत्याही जोडपत्रासह) पालन करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे नियम करता येतील.]

---

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल केले.

नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

**५.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणतेही वायुयान किंवा वायुयानांचा वर्ग यांची निर्मिती, ताबा, वापर, प्रचालन, विक्री, आयात किंवा निर्यात यांचे विनियमन करण्यासाठी [१][आणि वायुयानाच्या प्रचालनात सुरक्षितता आणण्याची सुनिश्चिती करण्यासाठी] नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांत खालील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर ज्याद्वारे करावयाचा असे प्राधिकार ;

(कक) वायुयान परिवहन सेवेचे विनियमन आणि त्या सेवेच्या स्थापनेला प्राधिकृत करणाऱ्या लायसनच्या प्राधिकाराच्या अधीनतेने व त्या लायसननुसार असलेल्या सेवांखेरीज अन्य सेवांमध्ये वायुयानाचा वापर करण्यास प्रतिबंध ;

[२][(कख) विमान परिवहन सेवा चालकांचे प्रशुल्क मंजूर करणे, नामंजूर करणे किंवा त्यात सुधारणा करणे यांसह, नागरी विमानचालन आणि विमान परिवहन सेवांचे आर्थिक विनियमन; यासंदर्भातील अधिकारांचा वापर करतील असे अधिकारी किंवा प्राधिकारी; असे अधिकारी किंवा प्राधिकारी यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि विचारात घ्यावयाच्या बाबी ; अशा अधिकाऱ्यांनी किंवा प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांविरुद्ध केंद्र सरकारकडे अपील करणे आणि अशा प्रशुल्कांशी संबंधित इतर सर्व बाबी.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनांसाठी "प्रशुल्क" या संज्ञेत, उतारू किंवा मालाच्या विमान परिवहनासाठी आकारण्यात येणारे भाडे, दर, मूल्यांकन खर्च आणि इतर आकारणी ; असे भाडे, दर, मूल्यांकन खर्च आणि इतर आकारणीवर परिणाम करणारे नियम, विनियम, पद्धती किंवा सेवा आणि उतारूंना किंवा जहाजी माल विक्री अभिकर्त्यांना प्रदेय असलेले आयोगाचे दर आणि अटी व शर्ती यांचा समावेश होतो.]

[३][(कग)] वायुयान परिवहन सेवेच्या स्थापनेचा प्राधिकार देणारे लायसन मिळण्यासाठी, अर्जदार असलेल्या किंवा लायसनधारक असलेल्या व्यक्तीने, नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यास सादर करावयाची माहिती ;

[४][(ख) विमानतळांचे लायसन देणे, तपासणी करणे आणि विनियमन करणे ; ज्या शर्तीअन्वये विमानतळांची देखभाल करण्यात येईल त्या शर्ती, लायसन देण्यात न आलेल्या विमानतळांच्या वापराबाबत प्रतिबंध किंवा विनियमन करणे आणि ज्यांना [५][भारतीय विमानतळ प्राधिकरण अधिनियम, १९९४] लागू होत नाही किंवा लागू करण्यात आलेला नाही अशा विमानतळांवर आकारण्यात येणारी फी ;

[६][ * * * * ]

(ग) वायुयानाची निर्मिती, दुरुस्ती आणि देखभाल यांची आणि जेथे वायुयानाची निर्मिती होते, दुरुस्ती होते किंवा ते ठेवण्यात येते त्या जागांची तपासणी आणि नियंत्रण ;

(घ) वायुयानाची नोंदणी आणि चिन्हांकन ;

(ङ) ज्या शर्तींच्या अधीनतेने, वायुयानाचे उड्डाण करता येईल किंवा त्यातून उतारू, डाक किंवा मालाची ने-आण करता येईल ; किंवा त्याचा औद्योगिक प्रयोजनांसाठी वापर करता येईल अशा शर्ती आणि वायुयानाने ने-आण करावयाची प्रमाणपत्रे, लायसने किंवा दस्तऐवज ;

(च) या अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी करावयाची, वायुयानाची तपासणी आणि अशा तपासणीसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधा ;

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९८३ चा अधिनियम १, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे पूर्वीच्या (कख) या खंडाला (कग) असे नाव देण्यात आले.

४. १९७१ चा अधिनियम ४३, कलम ४१ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. भारतीय विमानतळ प्राधिकरण अधिनियम, १९९४ (१९९४ चा ५५) कलम ४५ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) द्वारे परंतुक वगळण्यात आले.

(छ) वायुयानाचे प्रचालन, त्याची निर्मिती, दुरुस्ती किंवा देखभाल यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींना लायसन देणे ;

(ज) ज्या विमानमार्गाद्वारे आणि ज्या शर्तींच्या अधीन राहून वायुयान भारतात प्रवेश करील किंवा भारताबाहेर जाईल किंवा भारतीय भूमीवरून उड्डाण करील असे विमानमार्ग आणि अशा शर्ती आणि ज्या ठिकाणी वायुयान उतरेल अशी ठिकाणे ;

(झ) कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रावरून, एकतर पूर्णवेळ किंवा एखाद्या विनिर्दिष्ट वेळापुरते अथवा विनिर्दिष्ट शर्तींच्या आणि अपवादांच्या अधीनतेने वायुयानास उड्डाण करण्यास प्रतिबंध ;

(ञ) हवाईमार्गाचे संकेतदीप, विमानतळाचे दिवे आणि विमानतळावरील किंवा विमानतळांजवळील दिवे अथवा हवाईमार्गावरील किंवा त्याच्या जवळील दिवे यांचा पुरवठा, पर्यवेक्षण आणि नियंत्रण ;

(ञञ) विमानतळांच्या लगत असलेल्या किंवा हवाईमार्गांवर किंवा त्यालगत असलेल्या खाजगी मालमत्तेवरील दिव्यांची उभारणी व देखभाल अशा मालमत्तेच्या मालकांकडून किंवा वहिवाटदारांकडून केली जाणे, अशा उभारणीचा व देखभालीचा खर्च केंद्र सरकारकडून देय असणे आणि अशा उभारणीचे व देखभालीचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे, तसेच त्या प्रयोजनांसाठी त्या मालमत्तेत प्रवेश करण्याचा हक्क असणे ;

(ट) वायुयानाशी किंवा वायुयानाकडून संपर्क साधण्याच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारे संकेत आणि संकेत देण्यासाठी उपयोगात आणला जाणारा उपकरण संच ;

(ठ) वायुयानातून कोणतीही विनिर्दिष्ट वस्तू किंवा पदार्थ वाहून नेण्यास प्रतिबंध आणि त्याचे विनियमन ;

(ड) जीविताच्या सुरक्षेची खबरदारी म्हणून करण्यात येणारी उपाययोजना आणि त्यासाठी लागणारी साधनसामग्री ;

(ढ) लॉगबुक देणे व ते ठेवणे ;

(ण) अधिनियम किंवा नियम यांअन्वये कोणतेही लायसन किंवा प्रमाणपत्र देण्याची किंवा त्याचे नवीकरण करण्याची रीत आणि शर्ती, त्या संबंधात करण्यात येणाऱ्या तपासण्या व चाचण्या, अशा लायसनचा किंवा प्रमाणपत्राचा किंवा कोणत्याही लॉगबुकचा नमुना, ताबा, सादरीकरण, पृष्ठांकन, ते रद्द करणे, निलंबित करणे किंवा प्रत्यर्पित करणे;

(त) या अधिनियमाखाली केलेले कोणतेही निरीक्षण, तपासणी, चाचणी व दिलेले किंवा नवीकरण केलेले प्रमाणपत्र किंवा लायसन याबाबत आकारावयाची फी ;

(थ) वायुयानासंबंधात किंवा वायुयानाचे प्रचालन, निर्मिती, दुरुस्ती किंवा देखभाल यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तींची अर्हता यासंबंधात भारताखेरीज अन्य ठिकाणी देण्यात आलेले लायसन व प्रमाणपत्रे यांना या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मान्यता देणे ;[१] ****

[२] [(थथ) विमानतळ निर्देश ठिकाणापासून दहा किलोमीटर त्रिज्येच्या परिसरात जनावरांची कत्तल करणे व त्यांची कातडी काढणे आणि कचरा, घाण व इतर प्रदूषित व हानीकारक वस्तू टाकणे यांस प्रतिबंध; आणि]

(द) या पोटकलमामध्ये निर्देशिलेल्या बाबींशी दुय्यम किंवा आनुषंगिक कोणतीही बाब.

[३][**५क.** (१) महासंचालक, नागरी विमानचालन किंवा केंद्र सरकारने याबाबत विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेला कोणताही अन्य अधिकारी, वेळोवेळी आदेशाद्वारे, या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असे, कलम ५, पोटकलम (२) च्या खंड (ख), (ग), (ङ), (च), (छ), (ज) व (ड) यांमध्ये विनिर्दिष्ट अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात जेव्हा महासंचालक, नागरी विमानचालन यांची किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची, भारताची सुरक्षितता किंवा वायुयान प्रचालनाची सुरक्षा यासाठी तसे करणे आवश्यक आहे, याबाबत खात्री पटेल अशा कोणत्याही प्रकरणी, वायुयान प्रचालनाच्या कामावर असलेल्या किंवा कोणत्याही विमानतळाचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना निदेश देऊ शकेल. **निदेश देण्याचा अधिकार.**

(२) पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या अशा प्रत्येक निदेशाचे, तो ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात आला असेल त्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून अनुपालन करण्यात येईल.]

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम ४ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

संकटकाळात आदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

**६.** (१) सार्वजनिक सुरक्षितता किंवा शांतता यासाठी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही आदेश देणे इष्ट आहे असे केंद्र सरकारचे मत झाले असेल तर, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे :—

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेली सर्व किंवा त्यापैकी कोणतीही लायसने किंवा प्रमाणपत्रे, एकतर पूर्णपणे किंवा आदेशात ज्या विनिर्दिष्ट करणे त्यास योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने रद्द किंवा निलंबित करू शकेल ;

(ख) संपूर्ण भारतावरून किंवा त्याच्या कोणत्याही भागावरून सर्व किंवा कोणत्याही वायुयानाच्या अथवा वायुयानाच्या वर्गाच्या उड्डाणास, एकतर पूर्णपणे किंवा आदेशात ज्या विनिर्दिष्ट करणे त्यास योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीन राहून, प्रतिबंध किंवा आदेशात अंतर्भूत केलेल्या रीतीने, विनियमन करू शकेल ;

(ग) कोणतेही विमानतळ, वायुयान कारखाना, उड्डाण विद्यालय किंवा क्लब किंवा जेथे वायुयानांची किंवा कोणत्याही वर्गाच्या किंवा प्रकाराच्या वायुयानांची निर्मिती, दुरुस्ती केली जाते किंवा ती ठेवण्यात येतात अशी ठिकाणे यांची उभारणी, देखभाल किंवा वापर याबाबत एकतर पूर्णपणे किंवा सशर्त प्रतिबंध किंवा त्याचे विनियमन करू शकेल ; आणि

(घ) कोणतेही वायुयान किंवा वायुयानाचा वर्ग किंवा कोणतेही विमानतळ किंवा वायुयान कारखाना, उड्डाण विद्यालय किंवा क्लब किंवा जेथे वायुयानाची निर्मिती, दुरुस्ती केली जाते किंवा ते ठेवले जाते असे ठिकाण, त्याचबरोबर, वायुयानाचे प्रचालन, निर्मिती, दुरुस्ती किंवा देखभाल यासाठी वापरली जाणारी कोणतीही यंत्रसामग्री, संयंत्र, सामग्री किंवा वस्तू, यांचा लोकसेवेसाठी शासनाला विनियोग करता यावा म्हणून, केंद्र सरकारकडून आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे व तशा रीतीने, ताबडतोब किंवा विनिर्दिष्ट वेळात सुपूर्द करण्यात याव्यात, असा निदेश देऊ शकेल.

[१][(१क) पोटकलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश या अधिनियमाखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमात त्याच्याशी विसंगत काहीही असले तरीही, लागू होईल.]

(२) पोटकलम (१) च्या खंड (ग) किंवा खंड (घ) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे जिला प्रत्यक्ष क्षती किंवा हानी पोहोचत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, केंद्र सरकार याबाबत नियुक्त करील अशा कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल अशी नुकसानभरपाई देण्यात येईल.

(३) केंद्र सरकार, पोटकलम (१) खाली दिलेल्या आदेशाचे अनुपालन होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, त्याला आवश्यक वाटतील आणि करावयाच्या असतील अशा उपाययोजना प्राधिकृत करील.

(४) पोटकलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाची जो कोणी जाणूनबुजून अवज्ञा करील किंवा त्याचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा त्याचे उल्लंघन करणारी कोणतीही कृती करील, तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल आणि ज्या न्यायालयाने त्याचा दोष सिद्ध केला असेल ते न्यायालय असा निदेश देईल की, ज्याच्या बाबतीत अपराध घडला आहे असे कोणतेही वायुयान किंवा वस्तू (जर कोणतीही असल्यास) किंवा अशा वस्तूचा कोणताही भाग शासनाकडे सरकारजमा करण्यात यावा.

अपघाताच्या अन्वेषणाबाबत नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

**७.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) कोणत्याही वायुयानाचे भारतात किंवा भारताच्या भूभागावरून ; किंवा

(ख) भारतात नोंदणी झालेल्या वायुयानाचे कोणत्याही ठिकाणी,

उड्डाण होत असताना किंवा उड्डाणाच्या ओघात उद्‌भवलेल्या कोणत्याही अपघाताचे अन्वेषण करण्याबाबत तरतूद करणारे नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न पोचवता, असे नियम,—

(क) विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा व्यक्तीला, कोणत्याही अपघाताची सूचना देण्यास फर्मावू शकतील ;

---

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ख) अशा अन्वेषणाच्या प्रयोजनांसाठी अपघात किंवा अन्वेषणाच्या संबंधात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी एकतर फेरबदलासह किंवा त्याशिवाय लागू करू शकतील ;

(ग) अन्वेषण होईपर्यंत ज्या वायुयानास अपघात झाला आहे त्या वायुयानात प्रवेश करण्यास किंवा हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करू शकतील आणि अन्वेषणाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल तेथवर, अशा कोणत्याही वायुयानात प्रवेश करण्यास, त्याची तपासणी करण्यास, ते हलवण्यास, त्याच्या जतनासाठी उपाययोजना करण्यास किंवा अशा कोणत्याही वायुयानाच्या बाबतीत अन्य कार्यवाही करण्यास कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत करू शकतील ; आणि

(घ) या अधिनियमान्वये दिलेले किंवा मान्यता दिलेले कोणतेही लायसन किंवा प्रमाणपत्र रद्द करणे, निलंबित करणे, पृष्ठांकित करणे किंवा परत करणे आवश्यक आहे, असे अन्वेषणान्ती दिसून आल्यास तशी कार्यवाही करणे प्राधिकृत करू शकतील किंवा आवश्यक करू शकतील आणि अशा प्रयोजनासाठी असे कोणतेही लायसन सादर करण्याची तरतूद करू शकतील.

**वायुयान रोखून ठेवण्याचा अधिकार.**

**८.** (१) केंद्र सरकारकडून याबाबत प्राधिकृत करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण, जर अशा प्राधिकरणाच्या मते,—

(क) एखाद्या वायुयानाच्या उद्देशित उड्डाणाचे स्वरूप विचारात घेता, त्या उड्डाणाने वायुयानातील व्यक्तींना किंवा कोणत्याही अन्य व्यक्तींना किंवा मालमत्तेला धोका पोहोचणार असेल ; किंवा

(ख) अशा वायुयानाला लागू असलेल्या या, अधिनियमाच्या किंवा नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन होण्याची सुनिश्चिती करण्यासाठी असे वायुयान रोखून ठेवणे आवश्यक असेल ; किंवा कलम ५ च्या पोटकलम (२), खंड (ज) किंवा खंड (झ) खाली तयार केलेल्या कोणत्याही नियमाच्या उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी [१][किंवा कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी] वायुयान असे रोखून ठेवणे आवश्यक असेल तर, असे वायुयान रोखून ठेवू शकेल.

(२) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिकाराचा वापर करण्यासाठी आनुषंगिक किंवा गौण अशा सर्व बाबींचे विनियमन करणारे नियम तयार करू शकेल.

**सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**८क.** केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विमानतळावर उतरणाऱ्या किंवा विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या कोणत्याही वायुयानाद्वारे कोणत्याही संक्रामक किंवा संसर्गिक रोगांची लागण किंवा फैलाव होऊन सार्वजनिक आरोग्याबाबत उद्‌भवणाऱ्या धोक्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि विमानतळावरून उड्डाण करणाऱ्या कोणत्याही वायुयानाद्वारे होणाऱ्या रोग संक्रमणास किंवा संसर्गाच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी आणि विशेषतः व या तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न पोचवता, भारतीय बंदरे अधिनियम, १९०८ (१९०८ चा १५), कलम ६, पोटकलम (१) चा खंड (त), उप खंड (एक) ते (आठ) अन्वये जलयाने व बंदरे यांच्याबाबत ज्या बाबींकरिता नियम करता येतील त्या बाबींसाठी वायुयानाच्या व विमानतळाच्या किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट विमानतळाच्या संबंधात तरतूद करणारे नियम करू शकेल.

**सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी संकटकालीन अधिकार.**

**८ख.** (१) जर भारतात किंवा भारतातील कोणत्याही भागात कोणत्याही गंभीर रोगाची साथ पसरली आहे किंवा पसरण्याची शक्यता आहे याबाबत आणि वायुयान एजन्सीद्वारे रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होण्याने सार्वजनिक आरोग्यास उद्‌भवणाऱ्या धोक्याच्या प्रतिबंधासाठी, त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याच्या सर्वसामान्य तरतुदी अपुऱ्या आहेत याबाबत केंद्र सरकारची खात्री झाली असेल तर, केंद्र सरकार अशा धोक्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करू शकेल.

(२) अशा कोणत्याही प्रकरणात केंद्र सरकार, कलम ८क द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांना बाध न पोहोचवता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ते वायुयान आणि त्यातून प्रवास करणाऱ्या व्यक्ती किंवा त्यातून वाहून नेल्या जाणाऱ्या वस्तू आणि विमानतळ यांच्या संबंधात, अशा परिस्थितीत त्यांना आवश्यक वाटतील असे तात्पुरते नियम करू शकेल.

---

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(३) कलम १४ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, पोटकलम (२) अन्वये नियम करण्याचा अधिकार हा, नियमांच्या पूर्व प्रकाशनानंतर नियम करण्याच्या शर्तींच्या अधीन नसेल, परंतु असे नियम, अधिसूचनेच्या तारखेपासून तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी अंमलात राहणार नाहीत :

परंतु, केंद्र सरकार, विशेष आदेशाद्वारे, ते नियम आणखी एका कालावधीसाठी किंवा अनेक कालावधींसाठी अंमलात ठेवणे चालू ठेवील, मात्र तो एकत्रित कालावधी तीन महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही.

**दावा न करण्यात आलेल्या मालमत्तेची सुरक्षित अभिरक्षा व ती पुन्हा स्वाधीन करणे याबाबत नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

[1][**८ग.** केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही विमानतळावर किंवा कोणत्याही विमानतळावरील कोणत्याही वायुयानात आढळून आलेली कोणतीही मालमत्ता योग्य अभिरक्षेत नसेल तेव्हा, अशा कोणत्याही मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेची आणि ती पुन्हा स्वाधीन करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी तरतूद करणारे नियम करू शकेल आणि अशा कोणत्याही नियमात विशेषतः खालील बाबींसाठी तरतूद करण्यात येईल, त्या बाबी अशा, —

(क) अशा कोणत्याही मालमत्तेचा हक्कदार असलेल्या व्यक्तीला ती मालमत्ता पुन्हा स्वाधीन करण्यापूर्वी त्या मालमत्तेच्या संबंधातील आकारांचे प्रदान करणे ; आणि

(ख) जेव्हा अशी कोणतीही मालमत्ता, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी त्या व्यक्तीकडे पुन्हा स्वाधीन करण्यात आलेली नसेल अशा प्रकरणांमध्ये, अशी कोणतीही मालमत्ता निकालात काढणे]

**जहाजभंग व नष्टशेष.**

**९.** (१) जहाजभंग व नष्टशेष याबाबतच्या [2][व्यापारी नौवहन अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४), भाग तेराच्या तरतुदी,] जलयानांना जशा लागू होतात तशाच त्या समुद्रावरील किंवा भरतीच्या पाण्यावरील किंवा त्यांच्यावरून जाणाऱ्या वायुयानालाही लागू होतील आणि जलयानाच्या मालकाला, नष्टशेष सेवा देण्याबाबत ज्या रीतीने यथोचित बक्षीस देण्यात येते त्याच रीतीने, वायुयानाचा मालक यथोचित बक्षीस मिळण्यास हक्कदार असेल.

(२) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त तरतुदींमध्ये आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे फेरबदल करून ते वायुयानाला लागू करील.

**इमारतींचे बांधकाम, वृक्षारोपण, इत्यादींना प्रतिषेध किंवा त्यांचे विनियमन करणे याबाबतचा केंद्र सरकारचा अधिकार.**

[3][ **९क.** (१) जर केंद्र सरकारचे असे मत असेल की, वायुयान प्रचालनाच्या सुरक्षिततेसाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे तर, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(एक) असा निदेश देऊ शकेल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, विमानतळ निर्देश ठिकाणापासून वीस किलोमीटरपेक्षा अधिक नसेल एवढ्या त्रिज्येच्या परिसरातील कोणत्याही जमिनीवर इमारत किंवा संरचनेचे बांधकाम केले जाणार नाही किंवा उभारले जाणार नाही आणि अशा जमिनीवर कोणतेही झाड लावण्यात येणार नाही आणि जेथे अशा जमिनीवर कोणतीही इमारत, संरचना किंवा वृक्ष असेल तेथे, त्याच्या मालकास किंवा ज्या व्यक्तीच्या नियंत्रणाधीन अशी इमारत, संरचना किंवा वृक्ष असेल त्या व्यक्तीस, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, अशी इमारत, किंवा, यथास्थिति, संरचना पाडून टाकण्याचे, असा वृक्ष कापून टाकण्याचे निदेशदेखील देऊ शकेल.

(दोन) असा निदेश देऊ शकेल की, विमानतळाच्या निर्देशस्थानापासून वीस किलोमीटरपेक्षा अधिक नसेल अशा त्रिज्येच्या परिसरातील कोणत्याही जमिनीवर, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या उंचीपेक्षा अधिक उंचीची कोणतीही इमारत किंवा संरचना यांचे बांधकाम करण्यात येऊ नये किंवा ती उभारण्यात येऊ नये किंवा जो वृक्ष अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उंचीपेक्षा अधिक उंच वाढण्याची शक्यता आहे किंवा जो सर्वसाधारणपणे त्या उंचीपेक्षा अधिक वाढतो अशा वृक्षाची लागवड करण्यात येऊ नये आणि अशा जमिनीवरील कोणतीही इमारत किंवा संरचना किंवा वृक्ष यांची उंची विनिर्दिष्ट उंचीपेक्षा अधिक असेल तेथे, ती इमारत, संरचना किंवा वृक्ष यांचा मालक किंवा त्यावर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती यांना, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, त्यांची उंची विनिर्दिष्ट उंचीपेक्षा अधिक होणार नाही, अशाप्रकारे कमी करण्याचे निदेशदेखील देऊ शकेल.

---

१. १९७२ चा अधिनियम १२, कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ विवक्षित शब्दांऐवजी हे शब्द दाखल केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(२) पोटकलम (१) च्या खंड (एक) किंवा खंड (दोन) अन्वये त्रिज्या विनिर्दिष्ट करतेवेळी आणि उक्त खंड (दोन) अन्वये कोणतीही इमारत, संरचना किंवा वृक्ष यांची उंची विनिर्दिष्ट करतेवेळी, केंद्र सरकार खालील गोष्टी विचारात घेईल:—

(क) विमानतळावर प्रचालन करणाऱ्या वायुयानाचे किंवा प्रचालन करण्याचे उद्देशित असलेल्या वायुयानाचे स्वरूप ; आणि

(ख) वायुयानाच्या प्रचालनाचे नियमन करणारी आंतरराष्ट्रीय मानके आणि शिफारस केलेल्या पद्धती.

(३) जेथे कोणतीही इमारत, संरचना किंवा वृक्ष यांच्या मालकाला किंवा त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीला, पोटकलम (१) अन्वये, अशी इमारत किंवा संरचना पाडण्याचा किंवा असा वृक्ष तोडण्याचा किंवा कोणतीही इमारत, संरचना किंवा कोणताही वृक्ष यांची उंची कमी करण्याचा निदेश देणारी कोणतीही अधिसूचना दिलेली असेल, तेथे, असा निदेश अंतर्भूत असणाऱ्या अधिसूचनेची एक प्रत, इमारत, संरचना किंवा वृक्ष यांच्या मालकावर किंवा, यथास्थिति, त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीवर,----

(एक) अशा मालकास किंवा व्यक्तीस ती पाठवून किंवा देऊन ; किंवा

(दोन) जर ती त्या प्रकारे पाठवता किंवा देता येणे शक्य नसेल तर, अशा मालकाच्या किंवा व्यक्तीच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा अशा मालकाच्या किंवा व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ पुरुष सदस्याला पाठवून किंवा देऊन किंवा असा मालक किंवा ती व्यक्ती सर्वात शेवटी ज्याठिकाणी राहिल्याचे किंवा तिने धंदा केल्याचे किंवा व्यक्तिशः फायद्यासाठी काम केल्याचे माहीत असेल अशा जागेच्या बाहेरील दारावर किंवा एखाद्या ठळक जागी लावून ; किंवा या मार्गाने ती बजावणे शक्य झाले नाही तर ;

(तीन) टपालाने,

—बजावण्यात येईल.

(४) पोटकलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही अधिसूचनेत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करणे हे, प्रत्येक व्यक्तीवर बंधनकारक असेल.

**९ख.** (१) जर कलम ९क च्या पोटकलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही अधिसूचनेमधील कोणत्याही निदेशाच्या परिणामी कोणत्याही व्यक्तीची काही हानी किंवा नुकसान होत असेल तर, अशा व्यक्तीला नुकसानभरपाई दिली जाईल, ज्याची रक्कम, यापुढे दिलेल्या रीतीने आणि त्या तत्त्वांनुसार निर्धारित केली जाईल; जसे की,— **नुकसानभरपाई देणे.**

(क) जेथे नुकसानभरपाईची रक्कम परस्पर संमतीने ठरविता येण्यासारखी असेल तेथे, अशा संमतीनुसार ती देण्यात येईल ;

(ख) जेथे अशी परस्पर संमती शक्य नसेल तेथे, केंद्र सरकार, जी व्यक्ती उच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा नियुक्त होण्यास अर्हतापात्र आहे अशा व्यक्तीस लवाद म्हणून नियुक्त करील ;

(ग) कोणत्याही विशिष्ट प्रकरणात, केंद्र सरकार, जिला नुकसानभरपाई देय आहे अशा कोणत्याही व्यक्तीला झालेल्या हानीच्या किंवा नुकसानीच्या स्वरूपाविषयी सखोल ज्ञान असलेल्या तज्ज्ञ व्यक्तीचे नामनिर्देशन करू शकेल आणि जेथे असे नामनिर्देशन करण्यात आले आहे तेथे, नुकसानभरपाई द्यावयाची आहे अशी व्यक्तीसुद्धा त्याच प्रयोजनाकरिता एका न्याय सहायकाचे नामनिर्देशन करू शकेल.

(घ) लवादासमोर कार्यवाहीचा प्रारंभ होताना, केंद्र सरकार आणि नुकसानभरपाई देय असणारी व्यक्ती, आपापल्या मतानुसार, नुकसानभरपाईची योग्य रक्कम किती आहे, हे नमूद करील ;

(ङ) विवादाच्या सुनावणीनंतर, लवाद, त्याला न्याय्य वाटेल इतकी नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करणारा निवाडा देईल आणि जिला किंवा ज्यांना अशी नुकसानभरपाई द्यावयाची आहे ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती विनिर्दिष्ट करील; आणि निवाडा देतेवेळी तो प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती, तसेच खालील गोष्टी विचारात घेईल :----

(एक) नुकसानभरपाईच्या हक्कदार व्यक्तीला तिच्या मिळकतीमध्ये झालेले नुकसान ;

(शा.म.मु.) एच ४१६३—३ (१०४०—५-०८)

(दोन) कलम ९क चे पोटकलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेमधील कोणत्याही निदेशाच्या परिणामी, अशी अधिसूचना काढण्यात आल्यानंतर लगेचच जमिनीचे बाजारमूल्य कमी झालेले असेल, तर अशा बाजारमूल्यामध्ये झालेली घट ;

(तीन) जेव्हा, कोणत्याही निदेशाला अनुसरून कोणतीही इमारत किंवा संरचना पाडण्यात आली असेल किंवा कोणताही वृक्ष तोडण्यात आला असेल किंवा कोणतीही इमारत, संरचना किंवा वृक्ष यांची उंची कमी केलेली असेल तेव्हा, अशा पाडण्यामुळे, तोडण्यामुळे किंवा कमी करण्यामुळे नुकसानभरपाईच्या हक्कदार व्यक्तीला झालेले नुकसान आणि असे पाडणे, तोडणे किंवा कमी करणे यासाठी अशा व्यक्तीकडून करण्यात आलेला खर्च ;

(चार) जिला नुकसानभरपाई द्यावयाची आहे अशा व्यक्तीला आपले निवासस्थान किंवा व्यवसायाची जागा बदलणे भाग पडले तर, अशा बदलास आनुषंगिक असा काही वाजवी खर्च तिला करावा लागत असल्यास, तो खर्च ;

(च) नुकसानभरपाईस हक्कदार आहे अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या बाबतीत कोणताही विवाद असेल तर, लवाद, अशा विवादाचा निर्णय करील आणि जर लवादाला असे आढळून आले की, एकापेक्षा अधिक व्यक्ती नुकसानभरपाईसाठी हक्कदार आहेत तर, तो नुकसानभरपाईच्या रकमेची अशा व्यक्तींमध्ये विभागणी करील.

(छ) लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०) मधील कोणतीही गोष्ट या कलमाखालील लवादांना लागू होणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या खंड (ङ) अन्वये लवादाने दिलेल्या प्रत्येक निवाड्यात, लवादासमोरील कार्यवाहीत केलेल्या खर्चाची रक्कम आणि खर्च कोणत्या व्यक्तीकडून करण्यात आला आणि किती प्रमाणात त्यांना त्याची वाटणी केली जाईल हेही नमूद करील.

**नुकसानभरपाई-विषयीच्या निवाड्यांबाबत अपिले.**

**९ग.** लवादाने कलम ९ ख अन्वये दिलेल्या निवाड्याने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा निवाड्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, ज्याच्या अधिकारितेत विमानतळ येत असेल त्या उच्च न्यायालयाकडे अपील करू शकेल :

परंतु, अपीलकाराला वेळेत अपील दाखल करण्यास पुरेशा कारणांनी प्रतिबंध झाला, याबाबत जर उच्च न्यायालयाची खात्री झाली तर, न्यायालय, उक्त तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरसुद्धा अपील स्वीकारू शकेल.

**लवादास दिवाणी न्यायालयांचे विवक्षित अधिकार असणे.**

**९घ.** कलम ९ख अन्वये नियुक्त केलेल्या लवादास, या अधिनियमान्वये लवाद कार्यवाही करतेवेळी, खालील विषयांच्या बाबतीत, वादाची न्यायचौकशी करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये दिवाणी न्यायालयास असलेले सर्व अधिकार असतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढणे आणि तिला हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रांवर साक्ष घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही सरकारी अभिलेखाची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांची तपासणी करण्याकरिता आयोगपत्र काढणे.]

**या अधिनियमाखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून केलेल्या कृत्याकरिता शास्ती.**

**१०.** (१) जर कोणी व्यक्ती, कलम ५ चे पोटकलम (२) च्या खंड (३) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमातील, वायुयानात शस्त्रे, स्फोटके किंवा अन्य धोकादायक माल वाहून नेण्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यास प्रतिषेध करणाऱ्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा त्या खंडान्वये केलेल्या नियमांनुसार अशा मालाच्या बाबतीत माहिती देण्यास फर्मावले असता, जर ती व्यक्ती, खोटी असलेली आणि जी खोटी आहे असे तिला माहीत आहे किंवा तिचा विश्वास आहे अशी किंवा जी खरी आहे यावर तिचा विश्वास नाही, अशी माहिती देईल तर ती व्यक्ती, आणि जर ती व्यक्ती मालक नसेल, तर त्या मालाचा मालकसुद्धा (जर त्याने, तो अपराध त्याला माहीत नसताना, त्याची संमती नसताना किंवा काणाडोळा केला नसतानाही केला गेलेला आहे, असे शाबीत केले नाही तर) दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस आणि दंडास सुद्धा पात्र ठरेल.

[1][(१क) जर कोणतीही व्यक्ती विमानतळ निर्देशस्थानापासून १० किलोमीटर त्रिज्येच्या परिसरात जनावरांची कत्तल करणे व त्यांची कातडी काढणे आणि कचरा, घाण व इतर प्रदूषित व हानीकारक वस्तू टाकणे यास प्रतिबंध करणाऱ्या, कलम ५ , पोटकलम (२) खंड (थथ) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमातील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील तर, ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(१ख) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१क) मध्ये निर्देशिलेला अपराध दखलपात्र असेल.]

(२) कलम ५ अन्वये कोणताही नियम करताना किंवा कलम ७, कलम ८, कलम ८ क किंवा कलम ८ ख अन्वये कोणताही नियम करताना, केंद्र सरकार, असा निदेश देईल की, त्या नियमाचा भंग हा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**धोकादायक उड्डाणाकरिता शास्ती.**

**११.** जो कोणी, जमिनीवरील किंवा समुद्रावरील किंवा हवेतील कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही मालमत्तेला धोका निर्माण होईल अशा प्रकारे कोणत्याही वायुयानाचे जाणूनबुजून उड्डाण करील, तो सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**कलम ५क अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**

[2][**११क.** जर कोणतीही व्यक्ती, कलम ५ क अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात जाणूनबुजून कसूर करील तर, ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा [3][दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास] किंवा दोन्ही शिक्षांना पात्र ठरेल.

**कलम ९क अन्वये दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**

**११ख.** (१) जर कोणतीही व्यक्ती, कलम ९ क अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेमधील कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात जाणूनबुजून कसूर करील तर, ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास अथवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदीस बाध न आणता, जर कोणतीही व्यक्ती, कलम ९ क च्या पोटकलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेमधील कोणत्याही निदेशास अनुसरून, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोणतीही इमारत किंवा संरचना पाडून टाकण्यात किंवा कोणताही वृक्ष तोडण्यात कसूर करील किंवा कोणतीही इमारत, संरचना किंवा वृक्ष यांची उंची कमी करण्यात कसूर करील तर, त्यावेळी, केंद्र सरकार, त्याबाबतीत करील अशा नियमांना अधीन राहून, केंद्र सरकारकडून त्याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, अशी इमारत किंवा संरचना पाडण्यास किंवा असा वृक्ष तोडण्यास अथवा अशी इमारत, संरचना किंवा वृक्ष यांची उंची कमी करण्यास सक्षम असेल.]

**अपराधास अपप्रेरणा देणे आणि अपराध करण्याचा प्रयत्न करणे यासाठी शास्ती.**

**१२.** जो कोणी, या अधिनियमाखालील किंवा नियमांखालील कोणताही अपराध करण्यास अपप्रेरणा देईल किंवा असा अपराध करण्याचा प्रयत्न करील आणि अशा प्रयत्नात, अपराध करण्याच्या दिशेने कोणतीही कृती करील तर, तो, त्या अपराधाकरिता तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र ठरेल.

**सरकारजमा करण्याबाबत आदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

**१३.** जेथे कोणत्याही व्यक्तीचा, कलम १० च्या पोटकलम (१) अन्वये किंवा कलम ५ च्या पोटकलम (२) च्या खंड (झ) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबत दोष सिद्ध झाला असेल तेथे, ज्या न्यायालयाकडून त्याचा दोष सिद्ध करण्यात आला असेल ते न्यायालय, असा निदेश देऊ शकेल की, ज्याच्या बाबतीत अपराध केला गेलेला आहे ते, यथास्थिति, वायुयान किंवा वस्तू किंवा पदार्थ, शासनाकडे सरकारजमा करण्यात येईल.

---

१. १९८८ चा अधिनियम ५०, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. १९७२ चा अधिनियम १२, कलम ११ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. २००० चा अधिनियम ५१, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

प्रकाशनानंतर नियम करणे.

[1][१४. या अधिनियमाद्वारे प्रदान केलेला, नियम करण्याचा कोणताही अधिकार, पूर्व प्रकाशनानंतर नियम केले जातील, ह्या शर्तीच्या अधीन असेल :

परंतु, केंद्र सरकार, लोकहितार्थ, लेखी आदेशाद्वारे, कोणत्याही प्रकरणी, पूर्व प्रकाशनाची शर्त सोडून देऊ शकेल.]

नियम संसदेसमोर मांडणे.

**१४क.** या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, लगेचच, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, [2][एका सत्राने किंवा दोन अथवा अधिक क्रमवर्ती सत्राने मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल आणि लगतनंतरचे सत्र किंवा उपरोक्तप्रमाणे क्रमवर्ती सत्र संपण्यापूर्वी,] दोन्ही सभागृहांचे, त्या नियमात काही फेरबदल करण्याबाबत एकमत झाले किंवा तो नियम तयार करू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, तद्नंतर, यथास्थिति, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशाप्रकारचा कोणताही फेरबदल किंवा शून्यीकरण झाल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

भारतात नोंदणीकृत नसलेल्या वायुयानावरील पेटंट मिळालेल्या नवशोधाचा वापर.

**१५.** भारतीय पेटंट आणि संकल्पचित्र अधिनियम,१९११ (१९११ चा २) याच्या कलम ४२ च्या तरतुदी, जशा त्या विदेशी वायुयानाला लागू होतात तशाच त्या, भारतात नोंदणीकृत नसलेल्या कोणत्याही वायुयानावरील नवशोधाच्या वापराला लागू होतील.

सीमाशुल्क कार्यपद्धती लागू करण्याचा अधिकार.

**१६.** केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८ (१८७८चा ८) याच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा फेरबदलांसह व अनुकूलनांसह हवाई मार्गे मालाची आयात व निर्यात करण्यास लागू होतील.

विवक्षित दाव्यांना मनाई.

**१७.** वारा, हवामान आणि प्रकरणाची एकंदर परिस्थिती पाहता, जमिनीपासून जेवढ्या उंचीवर वायुयानाचे उड्डाण होणे वाजवी असेल तेवढ्या उंचीवरून एखाद्या वायुयानाचे कोणत्याही मालमत्तेवरून उड्डाण होत असल्याच्या कारणावरूनच केवळ किंवा अशा उड्डाणामुळे होणाऱ्या सर्वसाधारण घटनेच्या कारणावरूनच केवळ कोणत्याही दिवाणी न्यायालयात अतिक्रमणाच्या संबंधात किंवा उपद्रवाच्या संबंधात दावा दाखल केला जाणार नाही.

अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या कृतीची व्यावृत्ती.

**१८.** या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीकरिता कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

हा अधिनियम लागू होण्याची व्यावृत्ती.

**१९.** (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही आदेश किंवा [3][कलम ८क किंवा कलम ८ख अन्वये केलेल्या नियमांव्यतिरिक्त अन्य कोणताही] नियम यांतील कोणतीही गोष्टच केवळ केंद्र सरकारच्या, नौसेनेत , भूसेनेत किंवा वायुसेनेत कार्यरत असलेल्या किंवा त्यांच्या मालकीच्या असलेल्या कोणत्याही वायुयानाला किंवा वायुयानाबाबत अथवा अशा वायुयानासंबंधात अशा सेवांमध्ये कामाला असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, लागू होणार नाही.

(२) हा अधिनियम किंवा त्याअन्वये केलेला कोणताही आदेश किंवा नियम यातील कोणतीही गोष्ट, भारतीय दीपस्तंभ अधिनियम,१९२७ (१९२७ चा १७) लागू होत असलेल्या कोणत्याही दीपस्तंभाला किंवा त्याच्याबाबतीत लागू होणार नाही, अथवा त्या अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून वापरण्याजोग्या असलेल्या कोणत्याही हक्काला किंवा अधिकाराला त्यामुळे बाध येणार नाही किंवा त्यावर परिणाम करणार नाही.

**२०.** [निरसित]. निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) (कलम २ व अनुसूची) द्वारे निरसित.

---

१. १९८५ चा अधिनियम ६९, कलम २ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल केले.

२. १९८३ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

३. १९७२ चा अधिनियम १२, कलम १२ द्वारे समाविष्ट केले.

# THE AIRCRAFT ACT, 1934

## वायुयान अधिनियम, १९३४

### इंग्रजी -मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abetment | अपप्रेरणा | [Section 12 (m.n.)] |
| adaptations | अनुकूलन | [Section 16] |
| aerodrome | विमानतळ | [Section 2 (2)] |
| aerodrome lights | विमानतळाचे दिवे | [Section 5 (2) (*j*)] |
| aerodrome reference point | विमानतळ निर्देश ठिकाण | [Section 2 (2*a*)] |
| air-route beacons | हवाईमार्गाचे संकेतदीप | [Section 5 (2) (*j*)] |
| arbitrator | लवाद | [Section 9 *b* (*b*)] |
| arms | शस्त्रे | [Section 10 (*1*)] |
| assessor | न्याय सहायक | [Section 9 *b* (*c*)] |
| award | निवाडा | [Section 9 *b* (*e*)] |
| cargo sales agent | जहाजी माल विक्री अभिकर्ता | [Section 5 (*2*) (*ab*) Expl.] |
| Civil Court | दिवाणी न्यायालय | [Section 9 *d* (m.n.)] |
| class of aircraft | वायुयानाचा वर्ग | [Section 3] |
| class of persons | व्यक्तींचा वर्ग | [Section 3] |
| commission | आयोगपत्र | [Section 9 *d* (e)] |
| compensation | नुकसानभरपाई | [Section 9 *b* (m.n.)] |
| convention | अभिसंधी | [Section 4] |
| customs procedure | सीमाशुल्क कार्यपद्धती | [Section 16 (m.n.)] |
| departure | प्रस्थान | [Section 2 (*2*) (2*a*)] |
| (to) detain | रोखून ठेवणे | [Section 8 (m.n.)] |
| Director General of Civil Aviation | महासंचालक, नागरी विमान चालन | [Section 5 *a* (*1*)] |
| dispute | विवाद | [Section 9 *b* (*e*)] |
| earths surface | पृथ्वीचा पृष्ठभाग | [Section 2 (1)] |
| emergency powers | संकटकालीन अधिकार | [Section 8b (m.n.)] |
| exempt | सूट | [Section 3] |
| explosive | स्फोटके | [Section 10 (*1*)] |
| export | निर्यात | [Section 2 (*4*)] |
| flying machines | उड्डाण यंत्रे | [Section 2 (*1*)] |
| flying school | उड्डाण विद्यालय | [Section 6 (*c*)] |
| forfeit | सरकारजमा करणे | [Section 6 (*4*)] |
| geometric centre | भूमितीय मध्य | [Section 2 (2*a*)] |
| horizontal | क्षितिजसमांतर | [Section 2 (2*a*)] |
| import | आयात | [Section 2 (3)] |
| infectious or contagious disease | संक्रामक किंवा सांसर्गिक रोग | [Section 8 (*a*)] |
| International Civil Aviation | आंतरराष्ट्रीय नागरी विमान चालन | [Section 4] |
| international standard | आंतरराष्ट्रीय दर्जा | [Section 4] |
| international standards | आंतरराष्ट्रीय मानके | [Section 9 A, 2(*b*)] |
| licence | लायसन | [Section 5 (*2*) (*aa*)] |
| light house | दीपस्तंभ | [Section 19 (*2*)] |
| log books | लॉगबुक | [Section 5 (*2*) (*d*)] |

| | | |
|---|---|---|
| marking of aircraft | वायुयानाचे चिन्हांकन | [Section 5 (2) (*s*)] |
| modification | फेरबदल | [Section 16] |
| nomination | नामनिर्देशन | [Section 9 (*b*) (*c*)] |
| obnoxious | हानिकारक | [Section 5 (2) (*zz*)] |
| operation | प्रचालन | [Full Title] |
| penalty | शास्ती | [Section 10 (m.n.)] |
| public health | सार्वजनिक आरोग्य | [Section 8 a (m.n.)] |
| reaction of the air | हवेची प्रतिक्रिया | [Section 2 (a)] |
| safe custody | सुरक्षित अभिरक्षा | [Section 8c (m.n.)] |
| salvage services | नष्टशेष सेवा | [Section 9 (1)] |
| slaughtering end Flaying of animals | जनावरांची कत्तल करणे व त्यांची कातडी काढणे. | [Section 5 (2) (*zz*)] |
| specified height | विनिर्दिष्ट उंची | [Section 9 a (*ii*)] |
| structure | संरचना | [Section 9 *a*] |
| surrender | प्रत्यर्पित | [Section 2 (*01*)] |
| suspend | निलंबित करणे | [Section 5 (2) (*01*)] |
| tariff | प्रशुल्क | [Section 5 (2) (*ab*)] |
| tidal waters | भरतीचे पाणी | [Section 9 (*1*)] |
| use of patented invention | पेटंट मिळालेल्या नवशोधाचा वापर | [Section 15 (m.n.)] |
| valuation charges | मूल्यांकन खर्च | [Section 5 (2) (*ab*) |
| water area | जलक्षेत्र | [Section 2 (2)] |
| wreck and salvage | जहाजभंग व नष्टशेष | [Section 9 (m.n.)] |

# वायुयान अधिनियम, १९३४

# THE AIRCRAFT ACT, 1934

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनुकूलन | adaptation | [कलम १६] |
| अपप्रेरणा | abetment | [कलम १२ (समासटीप)] |
| अभिसंधी | convention | [कलम ४] |
| आयात | import | [कलम २ (३)] |
| आयोगपत्र | commission | [कलम ९ घ (ङ)] |
| उड्डाण विद्यालय | flying school | [कलम ६ (ग)] |
| उड्डाण यंत्रे | flying machines | [कलम २ (१)] |
| आंतरराष्ट्रीय दर्जा | international standard | [कलम ४] |
| आंतरराष्ट्रीय नागरी विमान चालन | International Civil Aviation | [कलम ४] |
| आंतरराष्ट्रीय मानके | international standards | [कलम ९ क, २(ख)] |
| क्षितिजसमांतर | horizontal | [कलम २ (२क)] |
| जनावरांची कत्तल करणे व त्यांची कातडी काढणे | slaughtering and flaying of animals | [कलम ५ (२) (यय)] |
| जलक्षेत्र | water area | [कलम २ (२)] |
| जहाजभंग व नष्टशेष | wreck and salvage | [कलम ९ (समासटीप)] |
| जहाजी माल विक्री अभिकर्ता | Cargo sales agent | [कलम ५ (२) (कख) स्पष्टी] |
| दिवाणी न्यायालय | civil court | [कलम ९ घ (समासटीप)] |
| दीपस्तंभ | light house | [कलम ११ (२)] |
| नष्टशेष सेवा | salvage services | [कलम ९ (१)] |
| नामनिर्देशन | nomination | [कलम ९ ख (ग)] |
| नुकसानभरपाई | compensation | [कलम ९ ख (समासटीप)] |
| निलंबित करणे | suspend | [कलम ५ (२) (०१)] |
| निर्यात | export | [कलम २ (४)] |
| निवाडा | award | [कलम ९ ख (ङ)] |
| न्याय सहायक | assessor | [कलम ९ ख (ग)] |
| पेटंट मिळालेल्या नवशोधाचा वापर | use of patented invention | [कलम १५ (समासटीप)] |
| पृथ्वीचा पृष्ठभाग | earth's surface | [कलम २ (१)] |
| प्रत्यर्पित | surrender | [कलम २ (०१)] |
| प्रचालन | operation | [पूर्ण शीर्ष] |
| प्रस्थान | departure | [कलम २ (२) (२क)] |
| प्रशुल्क | tariff | [कलम ५ (२) (कख)] |
| फेरबदल | modification | [कलम १६] |
| भरतीचे पाणी | tidal waters | [कलम ९ (१)] |
| भूमितीय मध्य | geometric centre | [कलम २ (२क)] |
| महासंचालक, नागरी विमान चालन | Director General of Civil Aviation | [कलम ५ क (१)] |

| | | |
|---|---|---|
| मूल्यांकन खर्च | valuation charges | [कलम ५ (२) (कख) (स्पष्टी)] |
| रोखून ठेवणे | (to) detain | [कलम ८ (समासटीप)] |
| लवाद | arbitrator | [कलम ९ ख (ख)] |
| लायसन | licence | [कलम ५ (२) (कक)] |
| लॉगबुक | log-books | [कलम ५ (२) (घ)] |
| वायुयान | aircraft | [ शीर्ष] |
| वायुयानाचा वर्ग | class of aircraft | [कलम ३] |
| वायुयानाचे चिन्हांकन | marking of aircraft | [कलम ५ (२) (घ)] |
| विमानतळ | aerodrome | [कलम २ (२)] |
| विमानतळ निर्देश ठिकाण | aerodrome reference point | [कलम २ (२क)] |
| विमानतळाचे दिवे | aerodrome lights | [कलम ५ (२) (ञ)] |
| विनिर्दिष्ट उंची | specified heights | [कलम ९ क (दोन)] |
| विवाद | dispute | [कलम ९ ख (ङ)] |
| व्यक्तींचा वर्ग | class of person | [कलम ३] |
| शस्त्रे | arms | [कलम १० (१)] |
| शास्ती | penalty | [कलम १० (समासटीप)] |
| सरकारजमा करणे | forfeit | [कलम ६ (४)] |
| सार्वजनिक आरोग्य | public health | [कलम ८ क (समासटीप)] |
| सीमाशुल्क कार्यपद्धती | customs procedure | [कलम १६ (समासटीप)] |
| सुरक्षित अभिरक्षा | safe custody | [कलम ८ग (समासटीप)] |
| सूट | exempt | [कलम ३] |
| संकटकालीन अधिकार | emergency powers | [कलम ८ख (समासटीप)] |
| संक्रामक किंवा सांसर्गिक रोग | infectious or contagious disease | [कलम ८ (क)] |
| संरचना | structure | [कलम ९ क] |
| स्फोटके | explosives | [कलम १० (१)] |
| हवाईमार्गाचे संकेतदीप | air-route beacons | [कलम ५ (२) (ञ)] |
| हवेची प्रतिक्रिया | reaction of the air | [कलम २ (क)] |
| हानिकारक | obnoxious | [कलम ५ (२) (यय)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई